सोमवार दि. ०५ ऑक्टोबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक ३४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाखांची मदत द्या- जरांगे पाटील

### मराठा आरक्षण आंदोलन, शेतकरी प्रश्न आणि निवडणूक प्रक्रियेवरून सरकारवर निशाणा

**जालना - प्रतिनिधी**

शेतकऱ्यांच्या गंभीर संकटाकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन पीक नुकसानीपोटी हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी केली. शेतकरी, मराठा आरक्षण आंदोलन तसेच निवडणूक प्रक्रियेसह विविध मुद्द्यांवरून त्यांनी राज्य सरकारवर जोरदार टीका केली. सरकारने शेतकऱ्यांच्या अश्रूंकडे दुर्लक्ष करू नये, अन्यथा जनतेच्या रोषाला सामोरे जावे लागेल, असा इशाराही त्यांनी दिला.



मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीसाठी सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मनोज जरांगे पाटील यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले. मराठा समाज आरक्षणाची मागणी करत असल्यामुळे आंदोलन दडपण्याचा किंवा ते मोडून काढण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला. राज्यातील विविध भागांमध्ये शेतकऱ्यांना पीक नुकसानीचा सामना करावा लागत आहे. अतिवृष्टी, पावसातील खंड आणि प्रतिकूल हवामानामुळे खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याचा मुद्दा उपस्थित करत जरांगे यांनी सरकारने शेतकऱ्यांना ठोस आर्थिक मदत देण्याची मागणी केली. ''शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये मदत द्या आणि त्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसा,'' अशी मागणी त्यांनी केली. शेतकरी आर्थिक संकटात असताना केवळ घोषणा न करता प्रत्यक्ष मदत त्यांच्या हातात पोहोचली पाहिजे, अशी भूमिका त्यांनी मांडली. शेतकऱ्यांच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष केल्यास त्याचा परिणाम सरकारला भोगावा लागू शकतो, असा इशाराही जरांगे यांनी दिला. निवडणूक प्रक्रियेबाबत बोलताना जरांगे पाटील यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले. भाजप सरकारने ज्ञानेश कुमार यांना पदावरून हटवून त्यांच्या जागी अन्य व्यक्तीची नियुक्ती करावी, अशी मागणी त्यांनी केली. सरकार आणि ज्ञानेश कुमार यांच्यात मिलीभगत आहे का, असा संशय निर्माण होत असल्याचा दावा जरांगे यांनी केला. निवडणूक प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात निर्माण होणाऱ्या प्रश्नांची स्पष्टता होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. यावेळी त्यांनी निवडणूक व्यवस्थेवर टीका करताना सरकारच्या कारभारावरही जोरदार प्रहार केला. ''यांची गुंडगिरी आणि दहशत आता लोकांना सहन होत नाही,'' असा आरोप त्यांनी केला. सरकारला इशारा देताना जरांगे पाटील यांनी जनतेच्या ताकदीचा उल्लेख केला. ''जनता तुम्हाला सत्तेवर बसवू शकते, तर ती तुम्हाला सत्तेवरून खालीही खेचू शकते,'' असे ते म्हणाले.

मराठा समाज आपल्या हक्काच्या आरक्षणासाठी आंदोलन करीत आहे. या मागणीसाठी आंदोलन करणाऱ्यांवर दबाव आणण्याऐवजी सरकारने समाजाच्या मागण्यांवर सकारात्मक चर्चा करावी, अशी मागणी त्यांनी केली. सरकारने आंदोलनाकडे दुर्लक्ष केल्यास परिस्थिती आणखी गंभीर होऊ (पान २ वर)

## माझ्ा गांव, आरोग्यदायी गांवासाठी सर्वांनी योगदान दयावे- गटविकास अधिकारी लिंबाजी बारगिरे



**जाफराबाद - प्रतिनिधी**

शासनाच्या आरोग्य विभागामार्फत मांझ गांव आरोग्यसंपन्न गांव हे अभियान राबविण्यात येत आहे,त्यामुळे निरोगी नागरिक,स्वच्छ गांव,सक्षम पंचायत,आरोग्यसंपन्न गांवाच्या विकासासाठी समाजातील विविध घटकांनी प्रामाणिक प्रयत्न करुन गांवाचा विकास साधावा,तसेच गांव स्वच्छ.सुंदर व आरोग्यदायी करावे,असे आवाहन गटविकास अधिकारी लिंबाजी बारगिरे यांनी ता.१ रोजी केले.येथील पंचायत समिती आरोग्य विभागाच्या वतीने माझ गांव आरोग्यदायी गांव अभियानातंर्गत तालुकास्तरीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रतिभा मुळीक, वैदयकिय अधिकारी डॉ.अशोक वाघमारे,वैद्यकिय अधिकारी डॉ. रिजवान, सुवर्णलंकार मंडळाचे अध्यक्ष तथा समिती सदस्य गजानन उदावंत, राजेंद्र मुरकुटे, सरपंच संघटनेचे अध्यक्ष राजीव गायकवाड,विस्तार अधिकारी विष्णु जायभाये, व्ही. ई. वाघमारे, माया कुमरे, देविदास देशमुख, सरपंच विठ्ठल गोरे, विजय परिहार, सतिश गाडेकर, गजानन गव्हाणे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलतांना श्री बारगिरे म्हणाले की, आरोग्य संपन्न गांव संकल्पना साकारण्यासाठी गावातील लोकसहभाग, प्रशासकीय यंत्रणेमध्ये समन्वय आणि अभियान यशस्वी करण्याचा संकल्प महत्वाचा आहे, असे त्यांनी सांगीतले. तर आरोग्य अधिकारी डॉ.प्रतिभा मुळीक (पान २ वर)

## 'आदिशक्ती नौं रूप, एक स्वरूप'चा भव्य सोहळा उत्साहात संपन्न

### नारीशक्तीच्या सामर्थ्याचे प्रभावी दर्शन; खचाखच भरलेल्या सभागृहासह YouTube Live वरही मिळाला उत्स्फूर्त प्रतिसाद

**जालना - प्रतिनिधी**

अग्रवाल समाज जालना अंतर्गत अग्रशक्ती बहु मंडळ २०२६ यांच्या वतीने शनिवार, ३ ऑक्टोबर रोजी महाराजा अग्रसेन फाउंडेशन येथे 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. भक्ती, संस्कृती आणि नारीशक्तीचा सुंदर संगम असलेल्या या कार्यक्रमाला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. संपूर्ण सभागृह प्रेक्षकांनी खचाखच भरले होते, तर कार्यक्रमाचे प्रक्षेपणही करण्यात आले. हे थेट प्रक्षेपण जवळपास १३ हजार नी



पाहिले. कार्यक्रमाला श्रीमती आशिमाजी मित्तल, जिल्हाधिकारी, जालना; श्री धनश्यामजी गोयल, उद्योगपती, जालना; श्रीमती कविताजी पित्ती, ठाकुरजी सॉल्वेक्स, जालना आणि श्री रविंद्रजी अग्रवाल, उद्योगपती, जालना यांची प्रमुख उपस्थिती लाभली. माँ आदिशक्तीच्या विविध रूपांच्या माध्यमातून नारीशक्तीचे सामर्थ्य, धैर्य, ममता, त्याग, आत्मविश्वास आणि कर्तृत्व यांचे दर्शन या कार्यक्रमातून घडवण्यात आले. महिलांनी सादर केलेल्या विविध नृत्य, अभिनय आणि भावपूर्ण सादरीकरणातून प्रत्येक रूपाची वेगळी ओळख आणि त्यामागचा सुंदर संदेश प्रभावीपणे मांडण्यात आला. मंचावर माँ आदिशक्तीची विविध रूपे साकार होत असताना उपस्थित प्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटाने आणि 'जय माता दी'च्या जयघोषाने कलाकारांचा उत्साह वाढवला. कार्यक्रमातील प्रत्येक सादरीकरणाला मिळालेली उत्स्फूर्त दाद ही या कार्यक्रमाच्या यशाची साक्ष ठरली.

या कार्यक्रमासाठी अनेक दिवसांपासून सुरू असलेली तयारी, सराव आणि नियोजन यामागे अग्रशक्तीच्या संपूर्ण टीमने घेतलेली मेहनत स्पष्टपणे जाणवत (पान २ वर)

## राज्यस्तरीय धनुर्विद्या चॅम्पियन स्पर्धेत,...

### रिकर्व्हमध्ये सोलापूरचा दबदबा; सांघिक व मिश्र प्रकारात सुवर्णपदक

### विजेते खेळाडूंचा आमदार अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते सुवर्णपदक सन्मान

**जालना - प्रतिनिधी**

राज्यस्तरीय धनुरधारी चॅम्पियन स्पर्धेचा समारोप कार्यक्रमाच्या प्रमुख अतिथी म्हणून जालनाचे आमदार अर्जुनराव खोतकर हे होते. त्यांच्या हस्ते विजेत्या स्पर्धकांना सुवर्णपदक, सिल्वर पदक पाचशे पदक देऊन गौरवण्यात आले.



महाराष्ट्र आर्चरी असोसिएशन व भीष्मा आर्चरी असोसिएशन, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने जे.ई.एस. महाविद्यालय येथे २ ते ४ ऑक्टोबर २०२६ दरम्यान झालेल्या २३ व्या महाराष्ट्र वरिष्ठ राज्य अजिंक्यपद तीरंदाजी स्पर्धेत रिकर्व्ह प्रकारात सोलापूर, सातारा आणि पिंपरी-चिंचवडच्या खेळाडूंनी वर्चस्व गाजवले. पुरुषांच्या ओव्हरऑलमध्ये साताऱ्याच्या पार्थ साळुंखेने ६७१ गुणांसह प्रथम, सोलापूरच्या रोशन डोर्गेने ६५६ गुणांसह द्वितीय, तर बुलढाण्याच्या स्वराज हिंगेने ६५५ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक एलिमिनेशनमध्ये क्रीडा प्रबोधिनीच्या उज्ज्वल ओलेकरला सुवर्ण, पुण्याच्या रितेश देशमुखला द्वितीय आणि पार्थ साळुंखेला तृतीय क्रमांक मिळाला.

पुरुष सांघिक एलिमिनेशनमध्ये सोलापूरच्या सैराज हणमे, करण सराडे, आदित्य पवार व शुभम जाधव यांनी सुवर्णपदक पटकावले. सातारा द्वितीय, तर क्रीडा प्रबोधिनी तृतीय ठरली. महिलांच्या (पान २ वर)

## हनुमंतखेड्यात दुष्काळी पंचनाम्याच्या नावाखाली शेतकर्यांचीची लुट ; शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार सेना युनियन

**सोयगाव - प्रतिनिधी**

तालुक्यातील हनुमंतखेडा गावात कोरड्या दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतीपिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यासाठी तलाठी कोंबरे गावात आले असल्याचे सांगण्यात आले. यावेळी गावातील काही राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना पंचनाम्याच्या फॉर्मसाठी प्रति शेतकरी ६० रुपये घेण्यात आल्याचा गंभीर आरोप स्थानिक शेतकऱ्यांकडून करण्यात आला आहे. गावातील सुमारे ७०० शेतकऱ्यांकडून प्रत्येकी ६० रुपये घेतले असल्यास ही रक्कम सुमारे ४२ हजार रुपये होते. दुष्काळामुळे आधीच आर्थिक अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांकडून अशा प्रकारे पैसे घेतले जात असल्याचा आरोप अत्यंत गंभीर असून, या प्रकरणाची निष्पक्ष व अधिकृत चौकशी करून सत्य परिस्थिती जनतेसमोर आणावी, अशी मागणी जिल्हा कार्याध्यक्ष, शिवसेना श्रमिक राष्ट्रीय कामगार (पान २ वर)

## 'नदी' होती अडथळा आता 'पूल' ठरला विकासाचा दुवा

### वालसा खालसा येथे पूर्णा नदीवरील नवनिर्मित पुलाचे लोकार्पण;केंद्र-राज्य सहकार्याने वर्षानुवर्षांचा प्रश्न मार्गी

**भोकरदन - प्रतिनिधी**

वर्षानुवर्षे मागणी,पावसाळ्यातील गैरसोय आणि नदी ओलांडताना नागरिकांना सहन कराव्या लागणाऱ्या अडचणींना अखेर पूर्णविराम मिळाला आहे.वालसा खालसा येथे पूर्णा नदीवर उभारण्यात आलेल्या नवनिर्मित पुलाचे लोकार्पण आज मोठ्या उत्साहात पार पडले.पुलाच्या रूपाने परिसरातील नागरिकांच्या अनेक वर्षांच्या मागणीला अखेर मूर्त स्वरूप मिळाल्याने ग्रामस्थांनी समाधान



व्यक्त केले.पूर्णा नदीवर पूल नसल्याने पावसाळ्यात नागरिकांच्या दळणवळणाचा अक्षरशः 'कोंडी'चा प्रश्न निर्माण होत होता. नदीला पाणी वाढले की शेतकरी,विद्यार्थी,नोकरदार,व्यापारी आणि सर्वसामान्य नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.त्यामुळे वालसा खालसा परिसरात पुलाची उभारणी व्हावी,ही मागणी अनेक वर्षांपासून सातत्याने लावून धरण्यात आली होती.ग्रामस्थांच्या सातत्यपूर्ण मागणीची दखल घेत केंद्र व राज्य सरकारच्या सहकार्याने पूर्णा नदीवरील पुलाचे काम पूर्ण करण्यात आले. आज झालेल्या लोकार्पणामुळे परिसरातील गावांमधील दळणवळण अधिक गतिमान होणार असून, नागरिकांचा वेळ आणि प्रवासातील अडचणी मोठ्या प्रमाणात कमी होणार आहेत. या पुलामुळे शेतमालाची वाहतूक,विद्यार्थ्यांची ये-जा,बाजारपेठेशी संपर्क आणि दैनंदिन व्यवहार अधिक सुलभ होणार आहेत. त्यामुळे पूल केवळ नदीवरील मार्ग नसून परिसराच्या विकासाला नवी दिशा देणारा दुवा ठरणार आहे.अनेक वर्षांपासून रखडलेली मागणी पूर्ण झाल्याने वालसा खालसा आणि परिसरातील ग्रामस्थांमध्ये (पान २ वर)

## सेवा संकल्प अभियानांतर्गत २३० अंगणवाडी सेविकांचा सन्मान

### 'आंगण मिलन' कार्यक्रमातून अंगणवाडी सेविकांच्या सेवेला सलाम

**जालना । प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टी जालना महानगर महिला मोर्चाच्या वतीने सेवा संकल्प अभियानांतर्गत अंगणवाडी सेविकांच्या सन्मानाचा 'आंगण मिलन' कार्यक्रम आयोजित करण्यात आला. गावखेड्यापासून शहरापर्यंत गर्भवती माता, नवजात माता, नवजात बालके तसेच अंगणवाडीत शिक्षण घेणाऱ्या बालकांची दैनंदिन सेवा करणाऱ्या अंगणवाडी सेविकांच्या कार्याची दखल घेत त्यांचा गौरव करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त तसेच



मुख्यमंत्री ते प्रधानमंत्री या जनसेवेच्या प्रवासाला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत देशभर सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत समाजातील विविध घटकांच्या सेवेत योगदान देणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला आहे.

अंगणवाडी सेविका या ग्रामीण व शहरी भागातील महिला, माता आणि बालकांशी सातत्याने संपर्कात राहून महत्त्वाची सामाजिक जबाबदारी पार पाडतात. त्यांच्या या कार्याचा सन्मान व्हावा, या उद्देशाने आयोजित 'आंगण मिलन' कार्यक्रमात जालना महानगर क्षेत्रातील एकूण २३० अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला.

यामध्ये जुना जालना विभागातील ६२, नवीन जालना ५३, पूर्व जालना ५४ आणि महानगर ग्रामीण विभागातील ६१ अशा एकूण २३० अंगणवाडी सेविकांचा गौरव करण्यात आला. कार्यक्रमाला १,०८८ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमासाठी भाजपा जालना महानगर महिला मोर्चाच्या प्रभारी लता फाळके यांची उपस्थिती होती. तसेच भाजपा महिला महानगराध्यक्ष शुभांगी देशपांडे, सुषमा खरात, स्नेहा जोशी, दीपाली बिनीवाले आणि रश्मी टेकवाणी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी परिश्रम घेतले. अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा गौरव करणाऱ्या या उपक्रमातून त्यांच्या सामाजिक योगदानाला व्यासपीठ मिळाले. माता व बालकांच्या आरोग्य, पोषण आणि प्राथमिक शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत असलेल्या या सेविकांचा सन्मान हा सेवा संकल्प अभियानाचा महत्त्वाचा भाग ठरला.

## जालन्यात १४ ऑक्टोबरला धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त भव्य व्याख्यान

### *डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सायंकाळी ७ वाजता आयोजन*

**जालना - प्रतिनिधी**

धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्त जालना येथे बुधवार, १४ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. टाऊन हॉल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात सायंकाळी ७ वाजता हे व्याख्यान होणार असून कपिल के. सरोदे मार्गदर्शन करणार आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १४ ऑक्टोबर १९५६ रोजी नागपूरच्या दीक्षाभूमीवर लाखो अनुयायांसह बौद्ध धम्माची दीक्षा घेतली. या ऐतिहासिक दिवसाचे सामाजिक, वैचारिक व ऐतिहासिक महत्त्व नव्या



पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यक्रमासाठी सुभाष बोर्डे अध्यक्ष, आकाश खरात उपाध्यक्ष, सुरज (सोनू) बोर्डे सचिव, एस. भुतेकर सहसचिव, नितीन जगताप, रवी खंडाळे व राहुल रत्नपारखे कार्याध्यक्ष, तर सचिन खरात स्वागताध्यक्ष म्हणून जबाबदारी पाहणार आहेत. आयोजन समितीमध्ये अनिल पा. म्हस्के, विष्णू पा. शेळके, योगिराज खरात, रवी पा. मुळे, नंदू सूर्यवंशी, अमर डोंगरे व शिवाजी गव्हाणे यांचा समावेश आहे. धम्मचक्र प्रवर्तन दिन हा सामाजिक परिवर्तन, समता, स्वाभिमान आणि बंधुतेचा संदेश देणारा ऐतिहासिक दिवस आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित व्याख्यानास नागरिक, विद्यार्थी, युवक, महिला तसेच आंबेडकरी विचारांचे अनुयायी यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजन समितीने केले आहे.

# संपादकीय...

## भव्यता वाढतेय, पण भक्तीची दिशा काय?

नवरात्रोत्सव अवघ्या काही दिवसांवर येऊन ठेपला आहे आणि जालना शहरातील वातावरण हळूहळू देवीमय होत आहे. संत्रे बंधू आर्ट्ससह विविध मूर्तिकारांच्या कारखान्यांमध्ये ६ ते तब्बल २० फुटांपर्यंतच्या दुर्गामूर्तींना अंतिम साज चढत आहे. कुठे रंगकाम सुरू आहे, कुठे नेत्रसजावट, कुठे अलंकारांची जडणघडण, तर कुठे मूर्ती मंडपात नेण्यासाठी अंतिम तयारी सुरू आहे. कारागिरांच्या हातून आकार घेत असलेले देवीचे भव्य रूप निश्चितच जालन्याच्या कलात्मक परंपरेचा अभिमान आहे. पण या भव्यतेकडे केवळ 'मोठी मूर्ती म्हणजे मोठा उत्सव' या नजरेने पाहण्यापेक्षा नवरात्राचा खरा अर्थही त्याच वेळी तपासण्याची गरज आहे. कारण देवीची उंची वाढविणे सोपे आहे; पण तिच्या विचारांची उंची समाजात वाढविणे अधिक महत्त्वाचे आहे. दरवर्षी मूर्तींचा आकार, सजावट, रोषणाई आणि मंडपांची भव्यता वाढताना दिसते. उत्सवाचे व्यापारीकरणही त्याच वेगाने वाढत आहे. मंडळांमध्ये आकर्षक मूर्ती असावी, सजावट वेगळी असावी, प्रकाशयोजना उठावदार असावी, सोशल मीडियावर आपला उत्सव चर्चेत यावा, यासाठी मोठी स्पर्धा सुरू असते. या स्पर्धेला विरोध करण्याचे कारण नाही. कला, रोजगार आणि स्थानिक अर्थव्यवस्थेला त्यातून चालना मिळते. जालन्यातील मूर्तिकारांची कला जिल्ह्याबाहेर पोहोचत असेल तर ती निश्चितच कौतुकाची बाब आहे. मात्र प्रश्न एवढाच आहे की, भव्य मूर्तीसमोर नतमस्तक होताना आपण त्या देवीने दिलेला संदेश आपल्या आचरणात उतरवतो आहोत का? नवरात्र म्हणजे शक्तीची आराधना. मग ही शक्ती केवळ मूर्तीमध्येच का असावी? ती मुलींच्या शिक्षणात, महिलांच्या सुरक्षिततेत, अन्यायाविरोधात उभे राहण्यात आणि समाजातील दुर्बल घटकांना आधार देण्यातही दिसली पाहिजे. नवरात्रात 'महिला शक्तीचा जागर' मोठ्या उत्साहाने केला जातो. महिलांचा सत्कार होतो. मुलींच्या कर्तृत्वाची उदाहरणे दिली जातात. देवीला 'आदिशक्ती' म्हणून पूजले जाते.

पण उत्सव संपल्यानंतर महिलांकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलतो का? हा प्रश्न अस्वस्थ करणारा असला तरी विचारायलाच हवा. देवीसमोर 'स्त्रीशक्तीचा विजय असो' म्हणताना मुलींच्या शिक्षणाला समान संधी देणे, महिलांच्या सुरक्षिततेची जबाबदारी स्वीकारणे, हुंडा, कौटुंबिक हिंसाचार, स्त्रीभेद आणि लैंगिक असमानतेविरोधात ठाम भूमिका घेणेहीच खरी देवीची आराधना आहे. देवीच्या हातातील शस्त्राची पूजा करण्यापेक्षा अन्यायाविरोधात आवाज उठविण्याची हिंमत समाजाने आत्मसात केली, तर नवरात्र खऱ्या अर्थाने सार्थकी लागेल. कारागिरांच्या कलेचा सन्मानही तितकाच महत्त्वाचा या सगळ्या चर्चेत मूर्ती घडविणाऱ्या कारागिरांचा विसर पडता कामा नये. एका भव्य दुर्गामूर्तीमागे अनेक दिवसांची मेहनत असते. सांगाडा उभारणे, मातीचे थर देणे, चेहऱ्याचे बारकावे घडविणे, हात-पायांची ठेवण, सिंहाची रचना, रंगकाम, अलंकार आणि अंतिम सजावट या प्रत्येक टप्प्यावर कुशल हातांची गरज असते. २० फुटांची मूर्ती उभी करणे हे केवळ आकाराचे आव्हान नसते; त्यामागे तांत्रिक कौशल्य, कल्पकता आणि मोठी जबाबदारी असते.त्यामुळे जालन्यातील मूर्तिकारांच्या कलेला स्थानिक पातळीवरच नव्हे तर व्यापक बाजारपेठ मिळणे ही सकारात्मक बाब आहे. उत्सवाची भव्यता वाढत असताना कारागिरांच्या श्रमाचे योग्य मूल्य आणि त्यांच्या कलेचा सन्मान वाढणेही तितकेच आवश्यक आहे. नवरात्रोत्सव हा धार्मिक उत्सव असला तरी त्याभोवती मोठी स्थानिक अर्थव्यवस्था निर्माण होते. मूर्तिकार, रंगकाम करणारे कलाकार, अलंकार तयार करणारे कारागीर, मंडप उभारणी करणारे कामगार, विद्युत सजावट करणारे, वाहतूकदार, फुलविक्रेते, ध्वनी व प्रकाशयंत्रणा पुरविणारे आणि छोटे व्यावसायिक अशा अनेकांना या काळात रोजगार मिळतो. म्हणून उत्सवाची भव्यता ही केवळ खर्च नसून स्थानिक अर्थव्यवस्थेची एक साखळीही आहे. मात्र या अर्थव्यवस्थेला शाश्वत आणि जबाबदार स्वरूप देण्याची वेळ आली आहे. दुर्गामूर्तींच्या निर्मितीत आणि विसर्जनात पर्यावरणाचा विचार करणे आता अपरिहार्य झाले आहे. मूर्तीचा आकार जितका मोठा, तितकीच तिच्या निर्मितीपासून विसर्जनापर्यंतची जबाबदारी मोठी. पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, नैसर्गिक रंगांना प्राधान्य, जलस्रोतांचे प्रदूषण टाळणे आणि प्रशासनाने आखून दिलेल्या नियमांचे पालन करणेया बाबी उत्सवाचा अविभाज्य भाग व्हायला हव्यात. भक्ती आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष असण्याचे कारण नाही. उलट निसर्गाचे रक्षण करणे हीदेखील शक्तीचीच उपासना आहे. जालन्यात यंदा २० फुटांपर्यंतच्या दुर्गामूर्ती तयार होत आहेत. ही कलात्मक प्रगती आहे. पण पुढचा टप्पा आणखी मोठा असायला हवा मूर्तीपेक्षा संदेश मोठा करण्याचा. एखाद्या मंडळाने मुलींच्या शिक्षणासाठी उपक्रम राबविला, रक्तदान केले, गरजू विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य दिले, महिलांच्या आरोग्याची तपासणी केली, पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला किंवा व्यसनमुक्तीसाठी जनजागृती केली तर त्या मंडळाची खरी भव्यता दिसून येईल. कारण उत्सव संपल्यानंतर मंडप उतरतो, रोषणाई निघून जाते, मूर्ती विसर्जित होते; पण उत्सवातून समाजाला मिळालेला संदेश कायम राहतो. जालना शहराची मूर्तीकला, उत्सवाची परंपरा आणि नागरिकांचा सहभाग यामुळे नवरात्रोत्सवाला निश्चितच व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे. आता या उत्सवाला सामाजिक जबाबदारीची जोड देण्याची गरज आहे. भव्य दुर्गामूर्तींसोबत भव्य सामाजिक संकल्पही उभे राहिले पाहिजेत. मुलगी वाचली पाहिजे, मुलगी शिकली पाहिजे; महिला सुरक्षित असली पाहिजे; अन्यायाविरोधात समाज उभा राहिला पाहिजे; पर्यावरण जपले पाहिजे आणि कारागिरांच्या कलेला सन्मान मिळाला पाहिजेहीच आजच्या नवरात्राची खरी गरज आहे. देवीच्या डोळ्यांत आपण शक्ती पाहतो. आता त्या शक्तीचा काही अंश आपल्या कृतीतही दिसायला हवा. मूर्ती २० फुटांची असो वा २ फुटांची; भक्तीची उंची मात्र माणुसकीपेक्षा मोठी नसावी. हीच जालन्याच्या नवरात्रोत्सवाची खरी ओळख ठरली, तर भव्य दुर्गामूर्तींचा उत्सव केवळ धार्मिक सोहळा राहणार नाही; तो सामाजिक परिवर्तनाचा उत्सव बनेल.

## श्लोक अकोलकर याचे निधन

**जालना -प्रतिनिधी**



जुना जालना भागातील समर्थनगरातील भाजपाचे व सामाजिक कार्यकर्ते सतिश अकोलकर व देवगिरी पतसंस्थेच्या कर्मचारी अर्चना अकोलकर (१९) यांचे चिरंजीव श्लोक सतिश अकोलकर यांचे अपघाती निधन झाले. श्लोक याचा अंत्यविधी आज ४ ऑक्टोबर रामतीर्थ स्मशानभूमी येथे करण्यात आला. श्लोकच्या पश्चात आई-वडील, बहिणी, काका, काकू असा मोठा परिवार आहे.

# तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स

आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ऍपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ऍपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती. हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ऍपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ऍपल १ पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ऍपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ऍनिमेशन सिनेमे बनवले.

ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ऍपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ऍपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ऍपलमध्ये परतले.

आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ऍपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ऍपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत. हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ऍपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ऍपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते.

ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# कुशिनारा बुद्ध विहार वडवली येथे वर्षावास धम्म प्रवचन मालिकेचे तिसरे पर्व मोठ्या उत्साहात संपन्न

**बोरघर माणगांव रायगड - प्रतिनिधी**



महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्थापित बौद्धजन पंचायत समिती अंतर्गत बौद्धजन पंचायत समिती तालुका शाखा माणगाव यांच्या आदेशान्वये शाखा क्रमांक १०, चार गाव ग्रुप वडवली विभागाच्या वतीने आयोजित वर्षावास धम्म प्रवचन मालिका २०२६ चे तिसरे पर्व माणगाव तालुका शाखा कोषाध्यक्ष / खजिनदार माननीय आयु. सुरेंद्र जाधव यांच्या अध्यक्षतेखाली तालुका अध्यक्ष माननीय आयु. रवींद्र मोरे, तालुका सचिव माननीय आयु. रघुनाथ साळवी, कायदेशीर सल्लागार मुंबई उच्च न्यायालयाचे जेष्ठ विधीज्ञ ॲड नरेश जाधव, प्रवचनकार माननीय अरविंद मोरे, खरवली विभाग शाखेचे ऑडिटर संतोष मोरे, शाखा नंबर एक चे सचिव आयु. प्रकाश मोरे, प्रवचनकार आयु. कुंदा राजन खरात मॅडम आणि तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार आयु. उत्तम तांबे, तालुका प्रसिद्धी प्रमुख पत्रकार विश्वास गायकवाड. इत्यादी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत मोठ्या उत्साहात आणि धम्ममय वातावरणात संपन्न झाले. मु. वडवली येथील कुशिनारा बुद्ध विहारात रविवारी झालेल्या या सोहळ्यास उपासक उपासिकांची लक्षणीय उपस्थिती लाभली होती.सकाळी १०.३० वाजता आयु. सुधाकर हाटे, आणि आयु. राजेंद्र नामदेव मोरे यांच्या शुभहस्ते धम्म ध्वजारोहणाने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

त्यानंतर बौद्धाचार्य आयु. लक्ष्मण मोरे, बौद्धाचार्य आयु अनिश येलवे, बौद्धाचार्य विजय पवार यांच्या मंगलमय वाणीतून धम्म संस्कार विधी घेण्यात आला.सदर कार्यक्रमाला संबोधित करताना माणगाव तालुका अध्यक्ष माननीय रवींद्र मोरे यांनी वर्षावास धम्म प्रवचन मालिका आयोजकांना आणि उपस्थितांना शुभेच्छा देत आगामी वर्षावास कार्यक्रम तसेच भीम चषक क्रिकेट सामने, शतकमहोत्सवी मनुस्मृति दहन दिन, २० मार्च चवदार तळे सत्याग्रह दिन या कार्यक्रमास सहकार्य,उपस्थिती आणि त्या अनुषंगाने बौद्धजन पंचायत समितीच्या माध्यमातून काढण्यात येणाऱ्या दिनदर्शिका आणि स्मरणिकेत आपल्या व्यवसायाची, उद्योगाची , शाखेची, संस्थेची किंवा वैयक्तिक स्वरूपाची जाहिरात देऊन सहकार्य करण्याचे आवाहन केले.तद्नंतर बुद्ध धम्म काल आणि आज या विषयावर प्रबोधन : दुपारी १२ ते १ या वेळेत आयुष्मती कुंदा राजन खरात (मॅडम) यांनी बुद्ध धम्म काल आणि आज या विषयावर ओजस्वी धम्म प्रवचन दिले. तथागत बुद्धांच्या शिकवणीचे आजच्या काळातील महत्त्व, पंचशील, अष्टांगिक मार्ग आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला धम्ममार्ग यावर त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले.

उपस्थित उपासकांनी शांतचित्ताने प्रवचन श्रवण केले. तद्नंतर आयोजकांच्या माध्यमातून उपस्थित सर्व मान्यवरांचे शाल आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले.

सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयु. सिद्धार्थ मोरे आणि आयु. नरेश साळवे यांनी केले, आभार प्रदर्शनानंतर आयु. संदीप तुकाराम मोरे यांच्या सौजन्याने देण्यात आलेल्या भोजन दान स्नेहभोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुंबई अध्यक्ष सुरेश मोरे, उपाध्यक्ष रुपेश जाधव, सचिव प्रकाश मोरे, खजिनदार गौतम साळवी, निलेश जाधव, स्थानिक अध्यक्ष संजय जाधव, उपाध्यक्ष प्रदीप गायकवाड, सचिव भागवत मोरे, खजिनदार युवराज मोरे, संघमित्रा महिला मंडळ व भीम इलेव्हन क्रिकेट संघ वडवली. आणि आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य. तारणे बौद्धवाडी स्थानिक अध्यक्ष यशवंत शिर्के, उपाध्यक्ष नरेश साळवे, सचिव निकेश साळवे, खजिनदार सुशील साळवे, मुंबई अध्यक्ष सचिन शिर्के, उपाध्यक्ष प्रवीण लोखंडे, सचिव राहुल महाडिक, खजिनदार प्रमोद खैरे, प्राजक्ता महिला मंडळ व शिल्पकार क्रिकेट संघ तारणे, आणि आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य. शिरवली आत्माराम बौद्धवाडी विकास मंडळ अध्यक्ष किर्तिराज शिर्के, सचिव सुरेंद्र जाधव, खजिनदार आदित्य जाधव आणि सर्व आजी माजी पदाधिकारी सभासद सदस्य इत्यादींचे बहुमोल सहकार्य लाभले.

# पान १ वरुन...

### शेतकऱ्यांना हेक्टरी...

शकते, असा इशारा देत त्यांनी ''आता संयमाचा बांध तुटणारच आहे,'' असे म्हटले. स्वतःसह मराठा आंदोलकांना मोठ्या प्रमाणात त्रास दिला जात असल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, नारायणगड येथे होणाऱ्या दसरा मेळाव्यासाठी मराठा समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले. समाजाची एकजूट आणि सहभाग या मेळाव्यातून दिसून यावा, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

मराठा आरक्षणाचा प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न आणि शासनाच्या विविध धोरणांविरोधातील भूमिका या पार्श्वभूमीवर नारायणगडचा दसरा मेळावा महत्त्वाचा ठरण्याची शक्यता आहे.

मराठा आरक्षणाच्या मागणीसोबतच शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याचा मुद्दाही जरांगे पाटील यांनी पुढे आणल्याने सरकारसमोरील राजकीय आणि सामाजिक दबावाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आला आहे. हेक्टरी एक लाख रुपयांची मदत, मराठा आरक्षणाची मागणी आणि निवडणूक प्रक्रियेबाबत उपस्थित करण्यात आलेले प्रश्न या मुद्द्यांवर सरकारची पुढील भूमिका काय राहते, याकडे आता लक्ष लागले आहे.

### माझ्ा गांव, आरोग्यदायी...

यांनी गाव पातळीवर आरोग्य दायी गांव अभियान कशा पध्दतीने राबवायचे, गावाचा कृति आराखडा, विविध उपक्रम याबाबत माहीती दिली. तर समिती सदस्य गजानन उदावंत यांनी गावाच्या शाश्वत विकासाचे ध्येय आणि संकल्पना साकारुन स्वच्छ व हरीत ,आरोग्यदायी गांव करुन गावाचा विकास करुन समृध्द पंचायत करावी,असे त्यांनी सांगीतले. यावेळी कल्याण कुळकर्णी, कुलदीप सेवलीकर, शाहीन कुरेशी, रेखा सपकाळ, शिवगंगा भालके, मिरा जाधव कडुबाई जोशी सुनिता कड शारदा गायकवाड निर्जला जोशी डी.एस. देव्हडे, व्हीटी लहाने, डॉ एस सी पठाण, पी.बी. खरात, के. पी. इंगळे, के.जी. सुलताने, ए. आर. खांडेभराड, व्ही. जे. खरात, एस. एन.देशमुख, एस. एस. पाटील, एस. एस. इंगळे,एस. के.जाधव, आर. बी.दांडगे, जी. एस. फदाट, एम. एम. सय्यद, के. पी. बकाल यांची उपास्थिती होती.

### आदिशक्ती नौ रूप...

होती. सहभागी महिलांनी अत्यंत उत्साहाने आणि एकजुटीने केलेल्या सादरीकरणामुळे संपूर्ण कार्यक्रमाला विशेष रंगत आली. कार्यक्रमाच्या यशामध्ये अग्रशक्ती बहु मंडळ २०२६च्या अध्यक्षा सौ. नेहा शिरीष अग्रवाल, सचिवा सौ. रुची अर्पण गोयल, उपाध्यक्षा सौ. नेहा विशाल गुप्ता, कोषाध्यक्षा सौ. श्वेता सिद्धांत तवरावाला, सहसचिवा सौ. पायल करण अग्रवाल, पूर्वाध्यक्षा सौ. रीता राम अग्रवाल तसेच सल्लागार सौ. सपना प्रेमेंद्र अग्रवाल आणि सौ. स्मिता राजेश पित्ती यांचे विशेष योगदान राहिले.

तसेच प्रोजेक्ट चेअरमन सौ. आरती मनोज पित्ती, सौ. गीता भागीरथ पंच, सौ. अर्चना मनोज अग्रवाल, सौ. नीता महावीर गंधकवाला, सौ. ममता नीरज गुप्ता, सौ. संध्या किशोर भुतिया, सौ. नीता गोविंद तवरावाला आणि सौ. पूनम अमित अग्रवाल यांनी कार्यक्रमाच्या नियोजनापासून ते प्रत्यक्ष आयोजनापर्यंत विशेष मेहनत घेतली.

या संपूर्ण कार्यक्रमामागे असलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या मेहनतीमुळे 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' हा केवळ एक सांस्कृतिक कार्यक्रम न राहता नारीशक्तीच्या सामर्थ्याला सलाम करणारा एक भव्य सोहळा ठरला.

कार्यक्रमाला सभागृहात मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि त्याचवेळी वर जवळपास १३ हजार ची उपस्थिती यामुळे या कार्यक्रमाची लोकप्रियता स्पष्ट झाली. प्रत्यक्ष उपस्थित प्रेक्षकांनी कार्यक्रमाचे भरभरून कौतुक केले आणि महिलांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला मनापासून दाद दिली. भक्ती, संस्कृती आणि नारीशक्तीचा संदेश घेऊन साकारलेला 'आदिशक्ती नौ रूप, एक स्वरूप' हा सोहळा जालना शहरातील एक संस्मरणीय सांस्कृतिक कार्यक्रम ठरला. अग्रशक्ती बहु मंडळाच्या संपूर्ण टीमने घेतलेल्या अथक मेहनतीला मिळालेला हा उत्स्फूर्त प्रतिसाद त्यांच्या कार्याची खरी पावती ठरली.

### राज्यस्तरीय...

ओव्हरऑलमध्ये पिंपरी-चिंचवडच्या शरवरी शेंडेने ६८० गुणांसह प्रथम, सोलापूरच्या गाथा खडकेने ६५७ गुणांसह द्वितीय, तर नाशिकच्या वैष्णवी कुलकर्णीने ६५१ गुणांसह तृतीय क्रमांक मिळवला. वैयक्तिक एलिमिनेशनमध्येही शरवरीने सुवर्ण पटकावले. सोलापूरच्या राजनंदिनी वाघमारेने द्वितीय, तर अमरावतीच्या तनुश्री श्रीनाथने तृतीय क्रमांक मिळवला. महिला सांघिकमध्ये नाशिक प्रथम, अहिल्यानगर द्वितीय आणि सोलापूर तृतीय ठरले.

मिश्र सांघिक एलिमिनेशनमध्ये सोलापूरच्या सैराज हणमे-गाथा खडके जोडीने सुवर्णपदक पटकावले. पिंपरी-चिंचवडच्या सोहम कणसे-शरवरी शेंडे जोडीला रौप्य, तर साताऱ्याच्या पार्थ साळुंखे-मृण्मयी कदम जोडीला कांस्यपदक मिळाले.

सर्व विजेत्या स्पर्धकांचे आमदार श्री.अर्जुनराव खोतकर यांनी कौतुक केले व त्यांचा सन्मान केला. यावेळी धनुर्धारी राज्य संघटनेतर्फे प्रमुख अतिथी सन्मानचिन्ह शाल श्रीफळ देऊन आमदार श्री. अर्जुनराव खोतकर, शिवसेना नेते पंडितदादा भुतेकर, डॉ. सुनयना प्रणितकर सत्कार करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर या स्पर्धेचे आयोजक धनुरधारी राज्य संघटनेचे सचिव श्री प्रकाश दुसेजा, जे ई एस महाविद्यालयचे क्रीडा विभाग प्रमुख प्रा. डॉ. हेमंत वर्मा, राष्ट्रीय खेळाडू तथा प्रशिक्षक श्री सचिन टेकुर, प्रा.डॉ .राजेंद्र सोनवणे , प्रा. राहुल सारस्वत यांची प्रमुख उपस्थिती होती,

समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ.राजेंद्र सोनवणे व प्रा. सुमित आमलेकर यांनी केले, प्रमुख पाहुण्यांचा राष्ट्रीय खेळाडू तन्मय अग्निहोत्री यांनी करून दिला, तर उपस्थितांचे आभार राष्ट्रीय खेळाडू कु.भवानी कोयतलू यांनी केले.

ही स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्रा. किशोर बीरकायलू, प्रा. प्रवीण चंदनशिवे, प्रा. किशोर खरात, श्री विलास बोधले, श्री भरत अहिरे यांनी परिश्रम घेतलेत. या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी जालना शहरातील व जिल्ह्यातील खेळाडू व पालक यांचे महत्वपूर्ण योगदान लाभल्याचे प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री यांनी सांगितले.

### 'नदी' होती...

उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. मान्यवरांची उपस्थिती लोकार्पण सोहळ्यास या विभागाचे आमदार नारायण कुचे, आमदार संतोष दानवे,माजी जिल्हा परिषद सदस्य गणेश फुके,डॉ.चंद्रकांत साबळे,गणेश ठाले, फकीरचंद इंगळे,रमेश मुरकुटे, गजानन इंगळे, दत्तू सोनवणे, जनार्दन सहाने,गणेश पाबळे, विकास बोर्डे, उत्तम शिंदे, रामेश्वर बदर,रामेश्वर जाधव, जनार्दन जाधव यांच्यासह ग्रामस्थ व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### हनुमंतखेड्यात दुष्काळी...

सेना युनियनचे हरीश राठोड यांनी केली आहे. शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे ही शासनाची प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्यामुळे पंचनाम्याच्या नावाखाली कोणत्याही शेतकऱ्याकडून अनधिकृतपणे पैसे घेतले गेले आहेत का, याची संबंधित महसूल प्रशासनाने चौकशी करावी. पैसे घेतले असल्याचे निष्पन्न झाल्यास संबंधितांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी आहे. दुष्काळात शेतकरी आर्थिक संकटात असताना त्यांच्यावर अतिरिक्त आर्थिक भार पडू नये, यासाठी जिल्हाधिकारी, तहसीलदार आणि संबंधित महसूल अधिकाऱ्यांनी या तक्रारीची तातडीने दखल घ्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

# जामखेडमध्ये ४३५ युवक-युवतींना ऑन द स्पॉट नोकरीची संधी

## आ. रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त रोजगार मेळावा; ९२९ युवक-युवतींचा सहभाग

**जामखेड - प्रतिनिधी**

ग्रामीण भागातील युवक-युवतींना त्यांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य व अनुभवाच्या आधारे रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आमदार रोहित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त जामखेड येथे रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. नागेश विद्यालय व कन्या विद्यालय येथे झालेल्या या मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. तब्बल ९२९ युवक-युवतींनी सहभाग नोंदवला, तर विविध नामांकित कंपन्यांनी घेतलेल्या मुलाखतींतून ४३५ युवक-युवतींची ऑन द स्पॉट निवड करण्यात आली. तसेच १३५ उमेदवारांना पुढील प्रक्रियेसाठी शॉर्टलिस्ट करण्यात आले. निवड झालेल्या उमेदवारांना यावेळी नियुक्तीपत्रेही देण्यात आली.

रयत शिक्षण संस्थेचा उत्तर विभाग, नागेश व कन्या विद्यालय, कर्जत-जामखेड एकात्मिक विकास संस्था आणि आमदार रोहित पवार मित्र मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. ग्रामीण भागातील युवकांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर करावे लागू नये आणि स्थानिक पातळीवरच त्यांच्या शिक्षण व कौशल्यानुसार रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने विविध कंपन्या आणि युवकांना एकाच व्यासपीठावर आणण्यात आले. या रोजगार मेळाव्याचे अध्यक्ष म्हणून रयत शिक्षण संस्थेच्या उत्तर विभाग, अहिल्यानगरच्या समन्वय समितीचे सदस्य मा. राजेंद्रजी कोठारी उपस्थित होते. तसेच रयत शिक्षण संस्था, उत्तर विभाग, अहिल्यानगरच्या सल्लागार समितीचे सदस्य मा. विजयसिंह गोलेकर, जामखेड पंचायत समितीचे माजी सभापती मा. सूर्यकांत नाना मोरे, अॅड. मयूर डोके




यांच्यासह विविध मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. विविध नामांकित कंपन्यांच्या प्रतिनिधींनी उमेदवारांच्या शैक्षणिक पात्रता, कौशल्य व अनुभवाच्या आधारे प्रत्यक्ष मुलाखती घेतल्या. त्यामुळे रोजगाराच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना थेट कंपन्यांशी संवाद साधण्याची आणि रोजगाराची संधी मिळाली. युवकांच्या हाताला काम आणि त्यांच्या कुटुंबांना आर्थिक स्थैर्य मिळवून देण्यासाठी अशा रोजगाराभिमुख उपक्रमांना सातत्याने व्यापक स्वरूप देण्याची गरज यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी नागेश विद्यालयाचे मुख्याध्यापक एस. व्ही. जाधवर, कन्या विद्यालयाच्या मुख्याध्यापिका आर. आर. भोर, प्रशांत काका राळेभात, वसीम सय्यद, राजेंद्र गोरे, इस्माईल भाई सय्यद, माजीत कुरेशी हे नगरसेवक तसेच सोले पाटील, सचिन शिंदे, सागर कोल्हे, रमेश आजबे, मंगेश आजबे, दादा राजे भोसले, नरेंद्र जाधव, काका कोल्हे, गणेश चव्हाण, शरद शिंदे, प्रशांत वारे, कुंडल राळेभात, बापू कार्ले, बबनआबा तुपेरे, सतीश शिंदे, प्रकाश काळे, प्रदीप शेटे, प्रवीण उगले, बाबासाहेब खैरे, रावसाहेब जाधव, नासिर चाचू, विभीषण परकड, प्रल्हाद गीते, दीपक नेटके, संदीप गायकवाड, सचिन डोंगरे, दादा महाडिक, हनुमंत भोसले, प्रणव राळेभात यांच्यासह दोन्ही विद्यालयांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. रोजगार मेळावा समन्वयक श्रीराम सातपुते यांनी मेळाव्याचे नियोजन व समन्वय केले. विविध नामांकित कंपन्यांचे प्रतिनिधी, ग्रामस्थ, पालक तसेच जामखेड तालुका व पंचक्रोशी परिसरातून मुलाखतीसाठी आलेले उमेदवार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

४३५ युवक-युवतींची ऑन द स्पॉट निवड आणि १३५ उमेदवारांची पुढील प्रक्रियेसाठी निवड झाल्याने हा रोजगार मेळावा ग्रामीण भागातील युवकांसाठी रोजगाराच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरला.

# रितिका चोप्रा, इंडियन एक्सप्रेस यांनी लोकशाहीचा चौथा स्तंभ भक्कम केला

भारतात लोकशाही बळकट करण्यासाठी ‘‘ मतदान‘‘ हेच श्रेष्ठ आहे.दर पाच वर्षांनी सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतात.लोकशाही दुबळी करण्याची कारस्थाने देशात घूमू लागली.महाराष्ट्रातील प्रबळ पक्ष शिवसेना ५६ वर्षात पदार्पण करीत असताना शिवसेनेत उभी फुट पाडली गेली, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष ( शरद पवार) देशातील मुस्सद्दी राजकारणी त्यांच्या पक्षात उभी फुट पाडली गेली.पश्चिम बंगालमध्ये ममता बॅनर्जी यांच्या तृणमूल काँग्रेस पक्षात फुट पाडली गेली.अशा घटना सातत्याने घडत गेल्या.यामागे भारत निर्वाचन आयोगाच्या आयुक्तांनी घेतलेल्या निर्णयांचा परिणाम देशातील सर्व घटक राज्यांना बसला. लोकशाही वाचवण्यासाठी लोकशाहीचा चौथा स्तंभ धावून आला.इंडियन एक्स्प्रेसच्या महिला पत्रकार रितिका चोप्रा यांनी आपल्या विशेष बातमीने निवडणूक आयोगाला घाम फोडला.बातमी प्रसिद्ध होताच संपूर्ण देशभरात पडसाद उमटले.अनेक राज्यात राजकीय पक्षांचे मोर्चे निघाले, आंदोलने झाली.देशातील मतदार लोकशाही वाचवण्यासाठी पुढे आले आहेत. रितिका चोप्रा इंडियन एक्सप्रेसचे मनः पूर्वक अभिनंदन.लोकशाही बळकट करण्यासाठी मतदान हेच श्रेष्ठ दान आहे.

मतदान प्रक्रियेत हेराफेरी करणाऱ्यांना शिक्षा झाली पाहिजे.लोकशाही बळकट करण्यासाठी कॉक्रोच जनता पार्टी उदयास आली.अभिजित दिपकने देशात तरुणांना स्फूर्ती दिली.आय ए एस अधिकारी तुकाराम मुंढे यांनी अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त पदभार स्वीकारल्यानंतर भेसळखोर, बनावट औषधे, दुग्धजन्य पदार्थांची तपासणी करून कडक कारवाई केली.ह्यांचे कार्य राष्ट्रीय सेवावृत्तीचे आहे.लोकशाही बळकट करण्यासाठी सर्वच स्तरावरून ऐकण्याची हाक ऐकू येत आहे.

**महादेव गोळवसकर**
**मुंबई**
**९८६९४७६२०९**

# सेवा परमो धर्मः हे डॉक्टर पी. एस. रामाणींच्या आयुष्याचे ब्रीदवाक्य - रवींद्र मालुसरे

**मुंबई -प्रतिनिधी**

आजच्या काळात अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध आहेत; परंतु त्या सुविधा प्रत्येक गरजू व्यक्तीपर्यंत पोहोचणे ही तितकीच महत्त्वाची बाब आहे. अनेक वेळा आर्थिक अडचणी, माहितीचा अभाव किंवा योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे सामान्य माणूस आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतो. परंतु सुप्रसिद्ध डॉ पी एस रामाणी हे गेली ५४ वर्षे सातत्याने एक दिवसाचा मेडिकल कॅम्प आयोजित करीत आहेत, शारीरिक दुःखाने उभे राहू न शकणाऱ्या पीडित माणसासाठी एक देव माणूस उभा राहतो’ वैद्यकीय शिबिर ही केवळ तपासणीची व्यवस्था न राहता; ते आशेचे दार बनते. हा या भावनेचा एक सुंदर आविष्कार आहे असे मी समजतो असे भावपूर्ण उदगार मराठी वृत्तपत्र लेखक संघ मुंबईचे अध्यक्ष रवींद्र मालुसरे यांनी काढले.




सुप्रसिद्ध ऑर्थोपेडिक सर्जन डॉ. पी. एस. रामाणी यांनी गरजू व्यक्तींना मदत व्हावी, त्यांना योग्य वैद्यकीय मार्गदर्शन मिळावे आणि आरोग्यसेवा त्यांच्या जवळ पोहोचावी, या उद्देशाने दादर हिंदू कॉलनी येथे शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्ट यांच्या वतीने मोफत शिबिर आयोजित केले होते त्यावेळी मालुसरे बोलत होते. मालुसरे पुढे असेही म्हणाले की, डॉक्टर होणे ही एक मोठी गोष्ट आहे; पण आपल्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा उपयोग समाजातील गरजू व्यक्तींसाठी करणे, ही त्याहून मोठी सामाजिक जबाबदारी आहे. आपल्या भारतीय संस्कृतीत एक सुंदर विचार आहे. ‘‘सेवा परमो धर्मः’’ रुग्णाला केवळ औषधाची गरज नसते; त्याला विश्वासाची, आपुलकीची आणि धीर देणाऱ्या शब्दांचीही गरज असते. ताठ कणा हा चित्रपट ज्यांच्या जीवनावर बनला ते डॉ रामाणी या उपक्रमाच्या केंद्रस्थानी गरजू माणूस ठेवून वयाच्या ८८ व्या वर्षी स्वतःला तंदुरुस्त ठेवत आजही कार्यरत आहेत ही अधिक महत्त्वाची गोष्ट आहे.

उपस्थित रुग्णांना सल्ला देताना डॉ. रामाणी म्हणाले की, आजारी पडल्यानंतर उपचार घेण्यापेक्षा आजाराची लक्षणे दिसताच तपासणी करून घेणे अधिक महत्त्वाचे आहे. आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका आणि आपल्या कुटुंबातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याची विशेष काळजी घ्या.

संस्थेचे सेक्रेटरी भूषण जाक यांनी आपल्या प्रास्ताविकात शांता सिद्धी चॅरिटेबल ट्रस्टच्या आजवरच्या सेवाभावी उपक्रमांचा आढावा घेतला. समाजातील एखाद्या व्यक्तीची वेदना कमी झाली, एखाद्या वृद्धाला पुन्हा व्यवस्थित चालता आले, एखाद्या रुग्णाच्या मनातील भीती कमी झाली तर त्या सेवेचे मूल्य पैशांत मोजता येत नाही आम्हालाही यात आनंद मिळतो. शिबिर यशस्वी करण्यासाठी डॉ सुदेन्दु बाबुलकर, डॉ अनुज तिवारी, डॉ शिवम पाटील, डॉ ओमकार शिर्के, स्वाती सावंत, संतोष घाडगे, अजित मोहिते यांनी विशेष मेहनत घेतली.

# ‘गुरू बिना ज्ञान अधुरा’ ; गुरू-शिष्याचे नाते अतूट असावे

जगातील शिक्षकांसाठी ५ आक्टोंबर सन्मानजनक दिन आहे. शिक्षकांच्या प्रती सहयोग व आत्मविश्वास वाढावा आणि भविष्यातील पिढीची आवश्यकता पुर्ण व्हावी याकरिता शिक्षकांमध्ये जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने या विशिष्ट दिवसाला आगळेवेगळे महत्व आहे.जगातील शिक्षकांना योग्य मार्गदर्शन मिळावे व शिक्षणामध्ये नविनीकरण व आधुनिकीकरण करण्याच्या उद्देशाने जागतिक पातळीवर शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो. ५ आक्टोंबर १९६६ रोजी पॅरिसमध्ये अंतर सरकारी सम्मेलनाचे आयोजन करण्यात आले होते. यात ‘‘टिचिंग इन फ्रीडम‘‘ संधीवर हस्ताक्षर करण्यात आले.यानंतर १९९४ ला युनेस्कोमध्ये एक सम्मेलन आयोजित करण्यात आले होते व यात ५ आक्टोंबर जागतिक शिक्षक दिवस साजरा करण्याची घोषणा करण्यात आली आणि तेव्हापासून ५ आक्टोंबर हा दिवस आंतरराष्ट्रीय शिक्षक दिवस म्हणुन साजरा करण्यात येतो. जागतिक स्तरावर ही बाब सर्वांनाच समजायला पाहिजे की गुरू शिष्याचे काय नाते असते.शिक्षक हा असा चेहरा आहे की तो लाखो ते करोडो विद्यार्थी घडवीतात म्हणजेच जग व देश घडवितो. शिक्षणा विषयी अचूक माहीती देणे व प्रत्येक गोष्टीचे महत्व समजावून देणे संपूर्ण शिक्षकांचे प्रथम कर्तव्य असते. यामुळेच आपण घडतो नंतर देश घडते व याचा संपूर्ण प्रभाव जगावर पडतो.शिक्षक दिनाचा महत्त्वपूर्ण उद्देश म्हणजे शिक्षकांना सन्मान मिळणे व विद्यार्थ्यांना देश घडवीण्यासाठी प्रोत्साहीत करणे.आपण जगात आधुनिकीकरण,यांत्रीकरण, औद्योगिकीकरण यांची वाटचाल जी पहात आहोत ती शिक्षकांपासुनच निर्माण झालेली उर्जाच म्हणावी लागेल. आपण पहाले की करोणा काळात ऑनलाइन शिक्षण प्रणाली सुरू होती.परंतु विद्यार्थीवर्ग ऑनलाईन शिक्षण प्रणालीला जवळ करायला तयार नव्हते.त्यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे नाते ऑनलाईन राहुच शकत नाही.कारण करोना काळातील दोन वर्षांच्या काळात संपूर्ण जगातील विद्यार्थी शिक्षकांपासुन व शाळा-कॉलेजपासुन दुरावले होते त्यामुळे संपूर्ण शिक्षणाचा खोळंबा झाला व आज विद्यार्थांना त्यांचे प्रायश्चित्त भोगावे लागत आहे आणि ऑफलाईन(प्रत्यक्ष) शिक्षण जड होतांना दिसत आहे.ऑफलाईन शिक्षणामुळे जेवढी ज्ञाणामध्ये भर पडते,तेवढी ऑनलाईन(अप्रत्यक्ष)शिक्षण प्रणालीत पडत नाही हे आपल्याला कोरोनाने दाखवून दिले.यामुळे प्रत्यक्षात शिक्षणाने जवळीक वाढुन ज्ञाणात मोठी भर पडते.प्रत्येक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करीत असतो. यामध्ये भारतात माजी राष्ट्रपती सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जन्म दिवशी म्हणजे ५ सप्टेंबरला शिक्षक दिवस साजरा करण्यात येतो,चीन २७ ऑगस्ट,रूस ५ आक्टोंबर अशाप्रकारे जगातील अनेक देश आप-आपल्या पध्दतीने शिक्षक दिवस साजरा करतात.कारण यामुळे शिक्षक व विद्यार्थी यांचे अतूट संबंध निर्माण होवून गुरू-शिष्याचे नाते निर्माण होतात. यामुळे शिक्षणाचे आगळावेगळे महत्व दिसून येते.परंतु ५ आक्टोंबर आंतरराष्ट्रीय शिक्षक दिनाचे वेगळेच महत्व आहे कारण संपूर्ण जग एकाच दिवशी शिक्षकांच्या गुणवत्तेची पावती जगाला देत असते व उत्सहाचे वातावरण निर्माण करतो.यामुळे जगातील शिक्षकांचा मानसन्मान वाढतो व गुरू-शिष्याचे घनिष्ठ संबंध निर्माण होते.जगात गुरू-शिष्याचे नाते आजचेच नसुन पुरातन काळातील आहे.ऋषी-मुनि,ज्ञाणी,देव-दानव,राजे-महाराजे, थोर पुरुष, क्रांतिकारक याची संपुर्ण वाटचाल शिक्षकांपासुनच निर्माण झाली आहे.आपण खेळांचा जरी विचार केला तर गुरू शिवाय खेळाडू सुध्दा तयार होत नाही.

म्हणजेच कोणतेही शिक्षण असो या करीता शिक्षक अती आवश्यक असतोच म्हणून म्हणतात ‘‘गुरू बिना ज्ञान अधुरा‘‘ आई-वडीलांमध्ये सूध्दा आपल्याला मुलांच्या दृष्टीकोनातून गुरू-शिष्याचे अतुट नाते दिसून येते.तेव्हाच मुलं-मुली परीपक्व होतात.त्याकाळी शिक्षकांना गुरू म्हणायचे व विद्यार्थ्यांना शिष्य.आताही तेच आहे फक्त शब्द बदलून शिक्षक-विद्यार्थी असे नामकरण झाले आहे.

म्हणजे पुर्वीही शिक्षकांविना ( गुरू) शिक्षण अधुरे रहायचे आणि आजही तेच आहे.त्यामुळे शिक्षक हा घटक जगासाठी व देशासाठी अत्यंत महत्त्वाचा आधारस्तंभ आहे.कारण यातुनच विद्यांर्थांचा उगम होतो व देश घडवीण्याचा मार्ग मोकळा होतो. शिक्षण हे विकत मिळत नसते तर ते अवगत करावे लागते. शिक्षण ही अशी संजीवनी आहे की त्याला कोणीही चोरू शकत नाही किंवा हीरावु शकत नाही. त्यामुळे शिक्षण



शिकण्यासाठी कोणत्याही प्रकारची वयोमर्यादा नसते.परंतु शिक्षणाचा उज्वल मार्ग निर्माण करण्यासाठी चांगल्या शिक्षकांची आवश्यकता जरूर असते. जगात बदलते हवामान पहाता आंतराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या निमित्ताने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पृथ्वीवरील जीवसृष्टी वाचविण्यासाठी ५ आक्टोंबरला प्रत्येक शिक्षकांनी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड करण्याचा संकल्प करावा व यात संपूर्ण विद्यार्थांना(शिष्यांना) सहभागी करून भारतासह संपूर्ण जगात हिरवागार गालिचा निर्माण होईल यापध्दतीने जगातील संपूर्ण शिक्षकांनी पाऊले उचलावीत.यामुळे निसर्ग प्रफुल्लित रहाण्यास मोठी मदत होईल.कारण गुरू-शिष्याच्या पुढील वाटचाली करीता मन प्रसन्न असने गरजेचे आहे.कारण पुर्वी शिक्षण हे वृक्षांच्याच सानिध्यात दिले जात असे त्यामुळेच आज प्रत्येकांच्या आयुष्यासाठी गुरू-शिष्याप्रमाणेच वृक्षांशीही नाते घनिष्ठ करणे गरजेचे आहे.कारण ज्या प्रमाणे शिक्षकांविना ज्ञाण नाही त्याच प्रमाणे वृक्ष विना सृष्टी नाही म्हणजेच संपूर्ण जीवन अधुरेच. त्यामुळे प्रत्येक सणाला, महत्त्वपूर्ण दिवसाला वृक्षारोपण व्हायलाच पाहिजे.५ आक्टोंबरला जागतिक शिक्षक दिवसाचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड व्हायला हवी. आंतराष्ट्रीय शिक्षक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार.**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

### ४० हून अधिक शेतकऱ्याची फसवणूक झाल्यामुळे प्रल्हाद टकले यांनी बदनापूर पोलीस स्टेशनलादिली तक्रार



**गेवराई बाजार - प्रतिनिधी**

गेवराई बाजार केळीगव्हाण येथील शेतकरी प्रल्हाद बाबुराव टकले यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी टमाट्याची पिक घेतले आहे, १७ सप्टेंबर रोजी गेवराई फाटा परिसरामध्ये एका शेडमध्ये राधे राधे ट्रेडिंग कंपनी नावानेच दुकान सुरू करून टोमॅटो खरेदी विक्री चालू केली व्यापारी राहणार संगमनेर जिल्हा अहिल्यानगर येथील व्यापारी सागर चिमण काकड व त्याचे दोन साथीदाराने प्रती १५ रुपये किलो दराने टोमॅटो खरेदी सुरू केली, गेवराई फाटा येथे शेतकऱ्यांनी आणलेले टोमॅटो व्यापाऱ्याने आयशर व ट्रक मध्ये भरून घेत या व्यापाऱ्याने शेतकऱ्यांना सांगितले कि उद्या परवा एकत्र पैसा देतो, असे सांगितले सदरील सर्व शेतकरी यांनी या व्यापारीवर विश्वास ठेवून १७ सप्टेंबर ते २८ सप्टेंबर रोज शेतकरी टमाटे द्यायचे ,मात्र शेतकऱ्यांनी पैशाची मागणी केली की आज बँक बंद आहे उद्या देतो, असे उडवाउडीचे उत्तर दिले जाऊ लागले सर्व शेतकऱ्यांच्या लक्षात आले की आपली फसवणूक झाली आहे हे लक्षात येताच बदनापूर पोलीस स्टेशनमध्ये रीतसिरतक्रार दाखल केली या प्रकरणी संशियत सागर चिमण काकड आणि त्यांचे दोन साथीदार यांच्यावर बदनापूर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# जालन्यात समृद्धीच्या कंत्राटदाराचा मनमानी कारभार विनापरवानगी शेतातून मुरूम उत्खनन

## २ कोटींच्या नुकसानीप्रकरणी विभागीय आयुक्तांकडे तक्रार

**परतूर - प्रतिनिधी**

जालना-नांदेड समृद्धी महामार्गाच्या कामासाठी एका शेतकऱ्याच्या मालकीच्या जमिनीतून कोणतीही पूर्वपरवानगी न घेता अनधिकृतपणे मोठ्या प्रमाणात मुरूम व मातीचे उत्खनन केल्याचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे.

उपविभागीय अधिकारी () कार्यालयाने वारंवार तक्रार करूनही कोणतीही दखल न घेतल्याने अखेर पीडित शेतकऱ्याने थेट विभागीय आयुक्त कार्यालयात धाव घेतली असून, दोषींवर कडक कारवाई आणि २ कोटी रुपयांच्या नुकसानभरपाईची मागणी केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मौजे सारवाडी शिवार (नेर, ता. जि. जालना) येथील गट क्रमांक १९ मधील सुमारे १ हेक्टर क्षेत्र वाढोणा (ता. परतूर) येथील शेतकरी श्री. गणेश कोंडीबा कुऱ्हे यांच्या मालकीचे व प्रत्यक्ष ताब्यात आहे. सदर जमीन महामार्गाच्या प्रत्यक्ष आराखड्यात येत नसतानाही, समृद्धी महामार्गाचे काम करणाऱ्या कंत्राटदाराने शेतकऱ्याची कोणतीही लेखी संमती अथवा करार न करता अवजड यंत्रसामग्रीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात मुरूम व मातीचे उत्खनन करून वाहून नेले. जमिनीचे अतोनात नुकसान या अनधिकृत उत्खननामुळे शेतात मोठमोठे खड्डे पडले असून जमिनीची सुपीकता, समतलता आणि शेतीयोग्यता पूर्णपणे नष्ट झाली आहे.



# आरक्षणाचा लाभ पहिल्याच पिढीला मिळावा : देवेंद्र भुजबळ

## जातिव्यवस्थेच्या निर्मूलनासाठी सावरकर, गांधी आणि डॉ. आंबेडकरांच्या अनुयायांनी एकत्र येण्याचे आवाहन; भूतानमध्ये १५वे स्वातंत्र्यवीर सावरकर संमेलन

**थिंपू (भूतान) - प्रतिनिधी**

भारतीय समाजात खरीखुरी समानता निर्माण करण्यासाठी घटनेने ज्या मागासवर्गीय समाजांना आरक्षणाची तरतूद केली आहे, त्या आरक्षणाचा लाभ संबंधित समाजातील पहिल्याच पिढीला मिळावा, जेणेकरून खऱ्याखुऱ्या गरजू मुला-मुलींना त्याचा लाभ मिळेल आणि त्यांना स्वतःच्याच समाजातील राजकीय, आर्थिक, प्रशासकीय व सामाजिकदृष्ट्या प्रबळ घटकांच्या मुला-मुलींशी स्पर्धा करावी लागणार नाही, असे प्रतिपादन निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी केले. भूतानची राजधानी थिंपू येथे नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या १५व्या स्वातंत्र्यवीर सावरकर संमेलनात स्वागताध्यक्ष तथा प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते.



भुजबळ म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांमध्ये व कार्यामध्ये एक समान धागा दिसून येतो आणि तो म्हणजे जातिव्यवस्थेचे निर्मूलन. त्यामुळे या तिन्ही महापुरुषांच्या अनुयायांनी निदान जातिव्यवस्थेच्या निर्मूलनाच्या मुद्द्यावर एकत्र येऊन प्रयत्न करण्याची गरज आहे.

जातिव्यवस्थेचे निर्मूलन करण्याची अपेक्षा केवळ सरकारकडून न करता, संबंधित समाजातील मंडळे, नेते आणि कार्यकर्त्यांनी स्वतःहून पुढाकार घ्यावा, असे आवाहनही त्यांनी केले.

संमेलनाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना लेखक सुधीर सेवेकर यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांची विज्ञाननिष्ठा आणि वैज्ञानिक दृष्टिकोन आचरणात आणण्याचे महत्त्व विशद केले. सावरकरांच्या विचारांचा अभ्यास करताना त्यांच्या विज्ञाननिष्ठ भूमिकेचाही विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संमेलनाचे प्रास्ताविक करताना छत्रपती संभाजीनगर येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊ सुरडकर यांनी मंडळाच्या आजवरच्या वाटचालीचा आढावा सादर केला.

प्रा. मगर यांनी संमेलनाचे सूत्रसंचालन केले. संमेलनादरम्यान विविध वक्त्यांनी सावरकरांच्या जीवनातील विविध पैलूंवर प्रकाश टाकला. यावेळी विविध सांस्कृतिक कार्यक्रमही सादर करण्यात आले.

**भूतानमध्ये देवेंद्र भुजबळ यांच्या 'झेप'चे प्रकाशन**

दरम्यान, निवृत्त माहिती संचालक देवेंद्र भुजबळ यांनी लिहिलेल्या व संपादित केलेल्या 'झेप' या पुस्तकाचे प्रकाशनही भूतानची राजधानी थिंपू येथे झालेल्या १५व्या सावरकर संमेलनात करण्यात आले. संमेलनाचे अध्यक्ष लेखक सुधीर सेवेकर, स्वातंत्र्यवीर सावरकर मित्र मंडळाचे अध्यक्ष भाऊ सुरडकर, भूतानचे प्रा. माधव यांच्यासह अन्य मान्यवरांच्या हस्ते पुस्तकाचे प्रकाशन झाले.

'झेप' या पुस्तकात विविध क्षेत्रांत उल्लेखनीय यश संपादन केलेल्या व्यक्तींच्या प्रेरणादायी यशकथा समाविष्ट करण्यात आल्या आहेत. त्यामध्ये डॉ. विजय भटकर, डॉ. रघुनाथ शेवगावकर, विकास खारगे, तुकाराम मुंडे, नयना गुंडे, सदानंद शेटे, डॉ. विजय शिरीषकर, सुधाकर तोरणे, दिलीप स्वामी, भावेश भाटिया, अण्णासाहेब टेकाळे, राधिका भांडारकर, आर. आर. लेमाडे, मारुती कदम, राम काजरोळकर, कृष्णा दिवटे, उमाकांत रासने, शरद चौधरी, नंदकुमार पाटील, अमोल मोहोळकर, सुखदा प्रधान सिंग, प्रमोद झिंजाडे, सुभाष खाकाळ, प्रा. डॉ. मनीषा चाळसे, दिलीप पाथरे, अनिल राजपिसे, शोभा जोपुळे, विराग मधुमालती, अश्विनी भोईर, पुनिता भडसावळे, डॉ. श्यामल सरडकर, जे. पी. देसाई, यज्ञेश सावे, अक्षय जाधव, मनीष गवई आणि अलका भुजबळ यांच्या प्रेरणादायी वाटचालीचा समावेश आहे. या यशकथा देवेंद्र भुजबळ, प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे, सुनील चिटणीस, नंदकुमार रोपळेकर, महेबूब कासार, नितांत राऊत, रश्मी हेडे आणि विजय होकर्णे यांनी लिहिल्या आहेत. न्यूज स्टोरी टुडे हे या पुस्तकाचे प्रकाशक आहेत. 'झेप'च्या माध्यमातून विविध क्षेत्रांत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून यश संपादन करणाऱ्या व्यक्तींच्या प्रेरणादायी प्रवासाला वाचकांसमोर आणण्यात आले आहे.

---

# गोरक्षकावर प्राणघातक हल्ला; परतूरमध्ये १० ते १५ जणांच्या टोळक्याकडून लोखंडी फायटरने मारहाण

**परतूर - प्रतिनिधी**

गोरक्षणाचे काम करत असल्याच्या रागातून एका २४ वर्षीय तरुणावर १० ते १५ जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची खळबळजनक घटना परतूर शहरात घडली आहे. जिल्हा परिषद उर्दू शाळेसमोर शुक्रवारी रात्री सातच्या सुमारास हा प्रकार घडला. याप्रकरणी परतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यंकटेश किशोर व्यास (वय २५, रा. जुना मोंढा, परतूर) हे संगीताचा व्यवसाय करतात तसेच गोरक्षणाचे कामही पाहतात. शुक्रवारी रात्री ७:१५ वाजण्याच्या सुमारास ते जि. प. उर्दू शाळेसमोर त्यांचे मित्र आनंदजी कोटे यांची वाट पाहत थांबले होते. त्यावेळी १० ते १५ जणांच्या टोळक्याने त्यांच्यावर धावून येत, तू गोरक्षकाचे काम करतोस, तुला धडा शिकवतो असे म्हणत शिवीगाळ व लाथाबुक्क्यांनी मारहाण सुरू केली. या टोळक्यातील नवाज व इम्रान (रा. परतूर) आणि त्यांच्यासोबत असलेल्या इतर १० ते १३ अनोळखी इसमांनी व्यंकटेश व्यास यांना खाली पाडून लोखंडी फायटरने डोक्यात मारून गंभीर जखमी केले. तसेच जिवे मारण्याची धमकी दिली. मध्यस्थी करण्यास आलेल्या आनंद कोटेचा यांनाही आरोपींनी शिवीगाळ करत ढकलून दिले. या मारहाणीच्या गदारोळात तक्रारदाराच्या गळ्यातील ७ ग्रॅम वजनाची सोन्याची साखळीही गहाळ झाली आहे. या प्रकरणी व्यंकटेश व्यास यांच्या तक्रारीवरून परतूर पोलीस ठाण्यात नवाज, इम्रान आणि इतर १० ते १३ अनोळखी इसमांविरुद्ध भारतीय न्याय संहिता () २०२३ मधील कलम ११८(१), १८९(२), १९०, १९१(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) अन्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अमोल भानूदास रावते करत आहेत.

---

# समर्थ अकॅडमीत गांधी जयंती; स्वच्छतेचा दिला संदेश

**जालना - प्रतिनिधी**

माय भारत, जालना, युवा कार्यक्रम व क्रीडा मंत्रालय, भारत सरकार आणि समर्थ करिअर अकॅडमी यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. महात्मा गांधी यांच्या स्वच्छता, शिस्त आणि सामाजिक बांधिलकीच्या विचारांना उजाळा देत यानिमित्ताने अकॅडमी परिसरात स्वच्छता मोहीमही राबविण्यात आली. सदर कार्यक्रमाचे आयोजन माय भारत, जालना येथील जिल्हा युवा अधिकारी मयुरकुमार गोरमे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.



कार्यक्रमास समर्थ करिअर अकॅडमीच्या संचालिका संध्या आनंदे, प्रमुख मार्गदर्शक सौरभ आनंदे, किरण आनंदे आणि माऊली धावडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीस महात्मा गांधी यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अकॅडमीच्या संचालिका संध्या आनंदे यांनी कार्यक्रमाची प्रस्तावना करताना महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याचा आणि त्यांच्या विचारांचा विद्यार्थ्यांनी आपल्या दैनंदिन जीवनात अंगीकार करण्याचे आवाहन केले. त्यानंतर प्रमुख मार्गदर्शक सौरभ आनंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. महात्मा गांधी यांनी स्वच्छतेला दिलेले महत्त्व, स्वच्छ भारताची संकल्पना तसेच समाजाप्रती प्रत्येक नागरिकाची जबाबदारी याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. स्वच्छता ही केवळ शासनाची किंवा एखाद्या संस्थेची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाने ती आपली सामाजिक जबाबदारी म्हणून स्वीकारली पाहिजे, असा संदेश यावेळी देण्यात आला. यानंतर गांधी जयंतीच्या अनुषंगाने अकॅडमी परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसराची स्वच्छता केली.

---

# गुरु-शिष्य परिवाराच्या आदर्श शिक्षकांसह विविध पुरस्कारांचे वितरण

**जालना - प्रतिनिधी**

गुरु-शिष्य परिवाराच्या वतीने दरवर्षी प्रदान करण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचा वितरण सोहळा ४ ऑक्टोबर रोजी शहरातील आनंद मंगल कार्यालयात उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जालना तालुका शिक्षक पतसंस्थेचे माजी अध्यक्ष तथा संचालक जगत घुगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त पोलीस उपअधीक्षक बळीराम गीते, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक रामेश्वर आंबेकर, गटशिक्षणाधिकारी गजानन वाळके, विस्तार अधिकारी श्रीमती विनय वडजे, चेअरमन सुभाष भडांगे, राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक जमीर शेख तसेच केंद्रप्रमुख संदीप ओळेकर उपस्थित होते.



या सोहळ्यात शिक्षण क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करीत असलेल्या १७ प्राथमिक शिक्षक, १ माध्यमिक शिक्षक, १ आदर्श मुख्याध्यापक, ४ आदर्श शाळा, स्वयंभू परिवार जालना आदर्श गुरु-शिष्य पुरस्कार तसेच मरणोत्तर गुरु-शिष्य पुरस्कार यांसह विविध पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक सुनील ढाकरगे यांनी प्रास्ताविकातून गुरु-शिष्य परिवाराच्या कार्याचा उद्देश व पुरस्कार सोहळ्यामागील भूमिका स्पष्ट केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौतम मोरे व राजपाल गजभिये यांनी केले, तर योगेश मोरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी गुरु-शिष्य परिवाराचे अध्यक्ष तथा राज्य शिक्षक पुरस्कारप्राप्त शिक्षक किशोर खंडाळे, उपाध्यक्ष बाबासाहेब ओळेकर, सचिव योगेश मोरे, निवृत्त मुख्याध्यापक वसंत सूर्यवंशी यांच्यासह सुधाकर सुरासे, बसवेश्वर केवडे, जालिंदर लाड, कल्पना पेंटेवाड, अरुण सुरशे, पवन चव्हाण, लक्ष्मण उजेड, दिनेश उजेड, मच्छिंद्र उजेड, शंकर पवार, अक्षय सुरसे, राजपाल गजबे व श्रीहरी उजेड यांनी परिश्रम घेतले.

या पुरस्कार सोहळ्यास शिक्षक, शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, गुरु-शिष्य परिवाराचे पदाधिकारी व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# बुद्धिबळात निकलकच्या लेकींची जिल्ह्यात विशेष कामगिरी; भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते गौरव

**निकलक - प्रतिनिधी**

शालेय बुद्धिबळ स्पर्धेत निकलक येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेच्या तीन विद्यार्थिनींनी जिल्हास्तरावर विशेष प्राविण्य मिळवत गावाचे नाव उज्ज्वल केले. विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरलेल्या या विद्यार्थिनींचा शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.कु. प्रतिमा जितेंद्र म्हस्के, कु. दीपाली राजू गोळे आणि कु. कोमल कृष्णा गवारे यांनी १४ वर्षांखालील गटात उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांच्या पालकांसह त्यांचा सत्कार करण्यात आला.



यावेळी भाऊसाहेब घुगे यांनी विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या मेहनतीचे कौतुक केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक व्यासपीठ उपलब्ध झाल्यास तेही जिल्हा व विभागीय स्तरावर यश मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमास केंद्रप्रमुख गणेश साबळे सर, मुख्याध्यापक विष्णू मुंडे सर, बुद्धिबळ प्रशिक्षक रवींद्र म्हस्के सर, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बळीराम सुरासे, माजी सरपंच भगवान सावंत, पोलिस पाटील अर्जुन शिंदे, रऊफ पटेल, मुनीर भाई, गजानन माने, पांडुरंग गवारे, प्रभाकर गवारे, लक्ष्मण गवारे, शेख नांदो, सद्दाम कुरेशी, मनोज जोशी, पांडुरंग शिंदे, आकाश कदम, महेश शिंदे, राजू गोळे, कृष्णा गवारे, कृष्णा शिंदे व प्रभू गवारे यांच्यासह शिक्षक, पालक, ग्रामस्थ आणि तरुण सहकारी उपस्थित होते. या विद्यार्थिनींच्या यशामुळे निकलकच्या शैक्षणिक क्षेत्रात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, विभागीय स्पर्धेत त्यांच्या कामगिरीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

---

# ५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक

## चौथ्या दिवशी ३१ इच्छुकांनी घेतले ५९ नामनिर्देशन पत्रे; १० उमेदवारांचे नामनिर्देशन दाखल

**छत्रपती संभाजीनगर - प्रतिनिधी**

५-औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघ निवडणूक-२०२६ साठी नामनिर्देशन पत्र दाखल करण्याच्या आजच्या दिवशी ३१ इच्छुक व्यक्तींना एकूण ५९ कोरे नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले. तसेच, आज दुपारी ३ वाजेपर्यंत १० उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले.

आज नामनिर्देशन दाखल केलेल्या उमेदवारांमध्ये श्रीधर नारायण साळवे (भीमसेना), संजीवनी मदन टेकाळे (अपक्ष), नामदेव केरबा वाघमोडे (अपक्ष), अकील अहमद शेख (आम आदमी पार्टी), ॲड. अंबादास जाधव (अपक्ष), अविनाश बंडू गोरे (अपक्ष), पाटील कसारे रमेश विनायकराव (अपक्ष), शेख अब्दुल मलिक अब्दुल खुद्दुस (राष्ट्रीय समाज पक्ष), संजीवनी मदनराव टेकाळे (स्वराज्य निर्माण सेना) आणि कृष्णा त्रिंबकराव पवार (अपक्ष) यांचा समावेश आहे. निवडणूक कार्यालयाच्या नोंदीनुसार या उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज व संबंधित तपशील नोंदविण्यात आले आहेत. आजअखेर एकूण ९७ इच्छुक व्यक्तींना १७४ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले असून, एकूण १२ उमेदवारांनी नामनिर्देशन पत्र दाखल केले आहेत.

---

# जेईएस महाविद्यालय मध्ये कंपाउंड राउंड राज्यस्तरीय धनुर्विद्या स्पर्धा.. सातारा येथील नेत्रा सहारे प्रथम

**जालना - प्रतिनिधी**

जेईएस महाविद्यालय जालना येथे राज्यस्तरीय ''कंपाउंड राउंड'' महाराष्ट्र राज्य वरिष्ठ धनुर्विद्या स्पर्धेचा आजचा दुसरा दिवस होता.स्पर्धेत आंतरराष्ट्रीय धनुर्धर सहभागी झाले असून भीष्म आर्चरी असोसीएशन तसेच गुरु द्रोणा आर्चरी अकॅडमी, जालना फर्स्ट सिटीझन फोरम व रोटरी क्लब जालना यांच्या संयुक्त विद्यमाने स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले. महाराष्ट्र धनुर्विद्या संघटनेचे अध्यक्ष श्री.प्रशांत देशपांडे, महासचिव श्री.प्रमोद चांदुरकर यांचे नेतृव व मार्गदर्शन लाभले.दुसऱ्या दिवशी विविध जिल्ह्यांमधून आलेल्या १३२ मुले व ९६ मुलींनी सहभाग नोंदवला. एकूण २२८ धनुर्विद्या खेळाडू कंपाउंड राउंड फेरीत सहभागी झाले.



टॉप ३२ महिला खेळाडूंपैकी मुलिंच्या गटात सातारा येथील नेत्रा सहारे हिने ७०२ गुण घेऊन राज्यातून प्रथम येण्याचा बहुमान मिळवला. अमरावती ची मधुरा धामणगावकर ६९८ गुण घेऊन द्वितीय क्रमांक पटकावला.सोलापूर येथील वैष्णवी पाटील हिने ६९६ अंक घेऊन तृतीय क्रमांक मिळवला तर बुलढाणा येथील श्रुष्टि बोरसे ६९५ गुण संपादन करून चौथे स्थान मिळवले तसेच पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवड महानगरातील वैदही जाधव हिला ९९४ गुण मिळाले व तिचा पाचवा क्रमांक आला. साताऱ्याची आदिती स्वामी हिने ६९३ गुण संपादित करून राज्यस्तरीय स्पर्धेत सहावे येण्याची उत्कृष्ट कामगिरी केली.सायंकाळी बातमी हाती येईपर्यंत मुलांच्या स्पर्धेचा निकाल घोषित करणे असे क्रीडा संचालक प्रा. डॉ. हेमंत वर्मा यांनी सांगितले. आज स्पर्धा यशस्वी होण्यासाठी प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री,धनुर्विद्या संघटनेचे राज्य सचिव श्री प्रकाश दुसेजा, श्री सचिन टेकुर, प्रा डॉ राजेंद्र सोनवणे, क्रीडा शिक्षक श्री.राहुल सारस्वत, प्रा. किशोर बिरकायलू, सर्व प्रशिक्षक राज्य धनुर्विद्या संघटनेचे पदाधिकारी आदींनी विशेष परिश्रम घेतलेत.

---

# बुलढाणा-सैलानी-जालना माहोरा मार्गे नवीन बस सुरु झाल्याने चालक व वाहकाचा सत्कार



**माहोरा - प्रतिनिध**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बुलढाणा - सैलानी - जालना माहोरा मार्गे नवीन बस सेवेचा माहोरा येथे ग्रामस्थांच्या वतीने नवीन बसची पूजा करून चालक व वाहकाचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला . माहोरा - राजूर गणपती मार्गावर नवीन बस सुरू झाल्याने प्रवाशांमध्ये आनंदाचे वातावरण आहे. या मार्गावर बस सुरू व्हावी अशी ग्रामस्थांची अनेक दिवसांपासून मागणी होती. यावेळी जेष्ठ नागरिक वामनराव लहाने, दादाराव जंजाळ , दत्तात्रय शहागडकर, अंकुश गाढे, सोमनाथ चौधरी, गणेश गायकवाड, भगवान सोनुने, अकतर शेख आदिंसह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. या बस सेवेमुळे माहोरा, वरुड खु, भोरखेडा, पिंपळगाव कड परिसरातील शाळकरी विद्यार्थी, शेतकरी व नोकरदार वर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.